बैलांच्या धावण्याच्या क्षमतेबाबत अभ्यास करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पविआ-१०१७/प्र.क्र.२२९/पदुम-३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:-०२ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना :-

राज्यात बैलगाडी शर्यतीच्या आयोजनास परवानगी देण्यासाठी **केंद्र शासनाच्या प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम,१९६०** मध्ये सुधारणा करण्यात आल्या असून, सदर सुधारीत अधिनियम दिनांक ३१ जुलै,२०१७ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. या अधिनियमातील सुधारीत तरतूदी दिनांक १०.०८.२०१७ पासून राज्यात लागू करण्यात आलेल्या आहेत.

२. उक्त अधिनियमातील सुधारीत तरतूदींच्या विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका (स्टॅम्प) क्र. २३१३२ / २०१७ दाखल करण्यात आली असून, सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक ११.१०.२०१७ रोजी अंतरीम आदेश पारीत केलेले आहेत. सदर आदेशामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने ए. नागराजा विरुध्द भारतीय जीवजंतू कल्याण मंडळ या याचिकेमध्ये दिनांक ०७.०५.२०१४ रोजी दिलेल्या अंतीम निकालामध्ये **बैल हा घोड्यासारखा कार्यकौशल्य प्रदर्शित करणारा प्राणी नाही तसेच बैलाची शरीर रचना विचारात घेता, बैल हा प्राणी शर्यतीमध्ये धावण्यास सक्षम नाही** असे निरीक्षण नोंदविले असल्याचे नमूद केले आहे. सदर निरीक्षणाच्या आधारे मा. उच्च न्यायालयाने राज्यात बैलगाडी शर्यतीस परवानगी नाकारली आहे.

३. विविध जातीतील बैल आणि घोडे यांची शरीर रचना, धावण्याची क्षमता, ओढ काम करण्याची क्षमता, त्याचप्रमाणे धावताना त्यांच्या शरीरामध्ये होणारे बदल (Physiological and Biochemical changes), इत्यादींचा अभ्यास करुन, अहवाल सादर करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

४. प्रस्तावनेमध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, याद्वारे खालीलप्रमाणे अभ्यासगट स्थापन करण्यात येत आहे.

(अ) अभ्यासगटाची संरचना:-

(१) डॉ. डी. एम. चव्हाण एम.व्हि.एस्सी. (पशु प्रजननशास्त्र) अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.	अध्यक्ष
(२) डॉ. आर. व्ही. गायकवाड एम.व्हि.एस्सी. पीएच. डी (पशुवैद्यकीय चिकीत्सालयीन औषधशास्त्र) प्रमुख पशुवैद्यकीय चिकीत्सालयीन औषधशास्त्र विभाग, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परेल, मुंबई.	सदस्य

(३) डॉ. एस. डी. इंगोले, सदस्य
एम.व्हि.एस्सी. पीएच. डी (पशुवैद्यकीय शरीरक्रिया शास्त्र)
प्रमुख पशुवैद्यकीय शरीरक्रिया शास्त्र विभाग,
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परेल, मुंबई.

(४) डॉ. अनिल एच. उलेमले, सदस्य
एम.व्हि.एस्सी. (पशुवैद्यक शल्यचिकित्सा आणि क्ष-किरण)
प्रमुख पशुवैद्यक शल्यचिकित्सा आणि क्ष-किरण विभाग,
के.एन.पी. पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा.

(५) डॉ. एस. बी. बानूबकोडे सदस्य
एम.व्हि.एस्सी. (पशुवैद्यक शरीररचना शास्त्र)
प्रमुख पशुवैद्यक शरीररचना शास्त्र विभाग,
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

(६) डॉ. व्ही. आर. पटोडकर सदस्य
एम.व्हि.एस्सी. पीएच. डी (पशुवैद्यकीय शरीरक्रिया शास्त्र)
प्रमुख पशुवैद्यकीय शरीरक्रिया शास्त्र विभाग,
के.एन.पी. पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा.

(७) डॉ. एस. बी. लंबाते सदस्य
एम.व्हि.एस्सी. (पशुवैद्यक शरीररचना शास्त्र)
प्रमुख पशुवैद्यक शरीररचना शास्त्र विभाग,
के.एन.पी. पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा.

(८) डॉ. एस. एन. जाधव सदस्य
एम.व्हि.एस्सी. (पशुवैद्यक जीवरसायन शास्त्र),
प्रमुख पशुवैद्यक जीवरसायन शास्त्र विभाग,
के.एन.पी. पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा.

(९) डॉ. पी. डी. भड सदस्य सचिव
एम.व्हि.एस्सी. (पशुवैद्यकीय औषधनिर्माण शास्त्र), एम.बी.ए.
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

५. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

(1) To study the anatomy and physiology of different types of breeds of bulls and bullocks in comparison with horse
(2) To study the capacity to running of different types of breeds of bulls and bullocks in anatomical comparison with horse
(3) To study the draught capacity of different types of breeds of bulls and bullocks in anatomical comparison with horse
(4) To study physiological and biochemical changes during the running of the bulls, bullocks and horses.
(5) To submit expert opinion regarding technical aspect like anatomical, physiological, biochemical, clinical & surgical interventions and aid for bulls and bullock as a race animal.
(6) To prepare comprehensive report of study and compilation of research work, studies and trials conducted across the world, its references and committee's expert opinion.

६. सदर समितीने त्यांचा अहवाल १ महिन्यात शासनास सादर करावा. तसेच सदर समिती या कामासाठी राज्यातील / देशातील / विदेशातील पशुवैद्यकशास्त्रातील तज्ञांची मदत घेऊ शकेल.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०३१२५५२४५४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vikas Tulshiram Kadam

Digitally signed by Vikas Tulshiram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b19d45ef776d80ef148059, cn=Vikas Tulshiram Kadam
Date: 2017.11.03 12:45:58 +05'30'

(विकास तु. कदम)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. सचिव (पदुम), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
७. निवड नस्ती (पदुम-३).